**नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३**
**सरकार वि. संजय वगैरे**
**निशाणी ४७**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– सुवर्णा धोंडीराम गायकवाड
**वय** :– ३५ वर्षे, **धंदा** :– घरकाम,
**राहणार** **:–** शेटफळे, ता. आटपाडी, जि. सांगली.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए.पी.केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत शपथेवर सुरू**

१. मी माझे पती, सासरे, सासू, दिर, दिराची पत्नी, माझी मुलगा आणि दिरांची दोन मुले असे एकत्र राहतो. मी सर्व आरोपींना ओळखते. ते आमच्या घराशेजारी राहण्यास आहेत.

२. घटना दि ०६.०६.२०२१ रोजी सायंकाळी ५.०० च्या दरम्यान घडली होती. त्यादिवशी माझे पती संध्याकाळी ५.०० च्या दरम्यान शेळया हिंडवण्यासाठी रानात चालले होते. त्यावेळी रामराव लक्ष्मण गायकवाड, संजय आणि मनिषा हे चारचाकी गाडीमधून येवून माझ्या पतीला शिवीगाळ करु लागले व ''रानातून जायचे नाही'' असे म्हणून दगडफेक करू लागले. त्यानंतर माझे पती काही न बोलता घरी आले व मेंढयाना शेड मध्ये घातले.

३. त्यानंतर विजय रामराव गायकवाड व त्यांची पत्नी वैशाली विजय गायकवाड हे माझ्या पतीच्या घरी येताना आडवे आले. त्यांची थोडी वादावाद झाली. वादावाद म्हणजे ''यायचे नाही येथे, आता मी तुला जिवंत सोडत नाही''. माझे पती काही न बोलता राहत्या घरी आले.

४. संध्याकाळी ८.०० वाजताच्या सुमारास रामराव, संजय, विजय, मनिषा आणि वैशाली हे आमच्या घरी भांडण्यासाठी काठ्या, कु–हाडे वगैरे घेवून आले. त्यावेळी त्यांनी शिवीगाळ केली. संजय गायकवाड याने माझ्या पतीच्या डोक्यात उजव्या बाजूला कु–हाड मारली. विजय गायकवाड याने माझे दिर बाळासाहेब गायकवाड यांच्या नाकावर आणि डोक्यात काठीने मारहाण केली.

**नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३**
**सरकार वि. संजय वगैरे**
**निशाणी ४७**

माझे सासरे संभाजी गायकवाड यांना विजय गायकवाड यांने लाथाबुक्क्या, काठीने पाठीत मारहाण केली. मी माझी जाऊ आणि सासू असे भांडण सोडविण्यास गेलो असता, मनिषा आणि वैशाली यांनी आम्हाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन मुक्का मार दिला. भांडण सुरू असताना शेजारी राहणारे भारत रावसाहेब पाटील आणि शहाजी दगडू पाटील यांनी येवून आमचे भांडण सोडवले. त्यानंतर माझे पती, दिर आणि सासरे अशांनी आटपाडी पोलीस स्टेशनमध्ये येवून तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांना दवाखान्यात उपचारासाठी पाठविले.

**५.** पोलिसांनी माझ्याकडे घटनेबद्दल चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता. मी सर्व आरोपींना पाहिल्यास ओळखू शकते. आज आरोपी क्र.३ रामराव न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एम.एम.पाटील, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

**६.** माझे शिक्षण बारावी पास पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे माहेर घाटनांद्रे गाव असून माहेरचे आडनाव शिंदे आहे. माझे लग्न ३०.०४.२००८ रोजी झाले आहे. मला तीन अपत्ये आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वैशाली व तिचा पती विजय हे नोकरीनिमित्त मुंबई येथे असतात. हे म्हणणे खरे आहे की, संजय आणि मनिषा हे नोकरीनिमित्त परगावी आहेत. सन २०२१ हा कोरोना कालावधी होता. हे म्हणणे खरे नाही की, कोरोना कालावधी असल्यामुळे आरोपी विजय व वैशाली हे गावाकडे आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जून २०२१ मध्ये आरोपी विजय आणि वैशाली हे मुंबई येथेच होते. हे म्हणणे खरे नाही की, विजय व वैशाली यांना जून २०२१ मध्ये कोरोना झाल्याने ते मुंबई येथे क्वारंटाईन होते. हे मला माहित नाही की, मनिषा संजय गायकवाड व तिच्या मुलाला कोरोना झालेला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मनिषा व तिच्या मुलाला कोरोना झाल्यामुळे तिच्या संपुर्ण कुटूंबाला घरात क्वारंटाईन केले होते.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, कोरोना कालावधीमध्ये एक पेक्षा अधिक व्यक्तीनी जमाव करुन एकत्र येण्यास निर्बंध होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या

गावामध्ये पंडीत नेहरु हायस्कूलमध्ये परगावहून आलेल्या लोकांना क्वारंटाईन केले जायचे. हे म्हणणे खरे नाही की, मे आणि जून २०२१ च्या दरम्यान संजय याला पंडीत नेहरु हायस्कलूमध्ये क्वारंटाईन केले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंडीत नेहरू हायस्कूलमध्ये कोण–कोणत्या व्यक्तीनां क्वारंटाईन केले होते त्यांची नावे मला व्यक्तीशः माहिती नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, आमचे व आरोपीच्या कुटूंबामध्ये जमिनीच्या कारणावरुन पूर्वीपासून वाद आहेत. साक्षीदार सांगतात की, २००९ पासून आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी लग्न होवून आल्यापासून आमच्यांत वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचे व आरोपीच्या कुटूंबामध्ये बोलणे–संभाषण बंद आहे आणि येणे–जाणे बंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे व आरोपीचे घर एकमेकाला लागून नाही. हे म्हणणे खरे आहे की, गणपत, दगडू, शशिकांत, गुलाब, राघू, वसंत यांची घरे आमच्या घराच्या आसपास आहेत. हे मला माहित नाही की, तात्या व्यंकूचा वाडा हा आमच्या घराला लागून आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, शेटफळ गावात वाडा पध्दत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेटफळ गावात साधारण ४ ते ५ मुख्य वाडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या–त्या वाड्यात राहणा–या लोकांची घरे थोडया थोडया अंतरावर आहेत. हे मला माहित नाही की, शेटफळ गावची लोकसंख्या बारा ते तेरा हजार आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेटफळ मोठे गाव आहे.

९. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराच्या समोरून आणि पाठीमागून पुर्व–पश्चिम चालीचे असे रस्ते गेलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराचे तोंड उत्तराभिमुख आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराच्या उत्तर आणि दक्षिण दिशेला चौकटी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराच्या उत्तरेकडून प्रथम सोफा, त्यानंतर एक खोली आणि त्या पलीकडे किचन आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या उत्तरेकडील दारासमोर उभे राहून बोलल्यास किचन पर्यंत आवाज ऐकू जात नाही. मी स्वयंपाक करते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामीण भागात सकाळी ९.०० पर्यंत आणि रात्री ८ ते९ पर्यंत स्वयपाक केला जातो. हे म्हणणे खरे नाही की आम्ही दररोज

याचवेळेला स्वयपाक करतो.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीसोबत शेतामध्ये झालेली घटना मी प्रत्यक्ष पाहिलेली नाही. मला झालेल्या मारहाणीबाबत मी डॉक्टरांना दाखविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की तसा उपचार घेण्यासाठी मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला कोणतीही मारहाण झाली नसल्यामुळे आम्ही दवाखान्यात उपचार घेतला नाही. साक्षीदार सांगतात की, मुले लहान असल्यामुळे आम्ही उपचार घेतला नाही. त्यावेळी माझा मोठा मुलगा पाचवीला होता, दुस–या क्रमांकाचा मुलगा तिसरीला व तिस–या क्रमांकाच्या मुलाचे वय पाच वर्षे असावे.

**११.** हे म्हणणे खरे नाही की संध्याकाळी ०८.०० वाजता आरोपी एकत्र आले व आम्हाला मारहाण केली असे आम्ही खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला कु–हाडीने मारले, दिराला आणि सास–यांना काठीने मारले आणि मला व माझ्या जावेला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि माझी जाऊ भांडणे सोडविण्यासाठी गेलो असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळी समक्ष हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.०६.०६.२०२१ रोजी संध्याकाळी ८.०० ते ८.३० च्या दरम्यान मी, माझे पती आणि आमचे कुटूंब आरोपीच्या घरात घुसून त्यांना गज आणि काठयाने मारहाण केली. आरोपींना मारहाण करताना आम्हाला म्हणजे माझ्या पतीला, दिराला आणि सास–याला झालेल्या जखमांचा गैरफायदा घेवून प्रस्तुतची खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ पोलीस खात्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की केस करण्याच्या दरम्यान माझा भाऊ माझ्या मदतीला आला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्या दरम्यान जमिनीवरुन वाद असल्यामुळे आणि त्या कारणावरुन आरोपींनी आमच्यावर केस करु नये म्हणून माझे पती, दिर व सासरे यांनी संगनमताने आरोपीविरुध्द प्रस्तुतची खोटी केस दाखल केली

**नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३**
**सरकार वि. संजय वगैरे**
**निशाणी ४७**

आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की पतीच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.12.17 17:23:46 +0530

दि. १७/१२/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी